दिनेश
बिल्डींग मटेरियल सप्लायर्स
खडी, क्रेशेन, वन फोर, डबर, वॉशटेन, मुरूम, वीट, सिमेंट ब्लॉक (सुट्ट सिमेंट मिळेल...)
मो. नं. 9271713368, 9860330587

दैनिक
# आकर्षण
संपादक : विजय सांगळे




वर्ष ५ । अंक २६३ । शनिवार १८ जुलै २०२६ । पाने ४ । मूल्य ₹ २ https://epaper.dainkaakarshan.com E-mail- dainikaakarshan@gmail.com RNI NO. MAHMAR/2021/84322

# एमआयडीसीतील कंपनीत चोरी करणारा मुद्देमालासह जेरबंद

**दैनिक आकर्षण । विशेष प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** नागापूर एमआयडीसी येथील मॅट्रीक्स इंजिनीअरिंग टेकनिक्स कंपनीच्या समोरून मुद्देमाल चोरी करणाऱ्या आरोपीला अटक करण्यात एमआयडीसी पोलिसांना यश आले आहे. ऋषिकेश बद्रीनाथ गायकवाड (वय २२, रा. दरंदले गल्ली, सोनई, ता. नेवासा) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव असून, त्याच्याकडून चोरीला गेलेला सर्व मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

याप्रकरणी फिर्यादी तुषार अशोक सोनवणे (वय ३२, रा. कसबे वस्ती, तपोवन रोड) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात तक्रार दिली होती. दिनांक २१ जून ते २२ जून दरम्यानच्या रात्री अज्ञात चोरट्याने त्यांच्या कंपनीच्या समोरून २० हजार ८०० रुपये किमतीचे जॉबचे पार्ट आणि ३ हजार रुपये किमतीच्या दोन ट्रॅव्हलिंग बॅग असा एकूण २३ हजार ८०० रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला होता. या तक्रारीवरून एमआयडीसी पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला होता.

वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या सूचनेनुसार एमआयडीसीचे सपोनि हेमंत थोरात यांनी तपास पथक स्थापन केले. गुप्त बातमीदाराकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलिसांनी सोनई येथून ऋषिकेश गायकवाड याला ताब्यात घेतले. त्याने गुन्ह्याची कबुली दिली असून पोलिसांनी त्याच्याकडून २३ हजार ८०० रुपयांचा संपूर्ण मुद्देमाल हस्तगत केला आहे. पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल संदीप पवार करत आहेत.



**पथकात यांचा सहभाग**

ही कामगिरी पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे, उपविभागीय पोलीस अधिकारी शिरीष वमने यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि हेमंत थोरात, सफौ राकेश खेडकर, पोहेकॉ संदीप पवार, शैलेश रोहोकले, राजू सुद्रीक, पोकॉ दीपक फुंदे, नवनाथ दहिफळे, किशोर जाधव, राहुल गुंडू आणि अरुण सांगळे यांच्या पथकाने केली.

नाशिकवारीने पोलीस मेटाकुटीला

# जिल्ह्यातील १२ दुय्यम कारागृहांना टाळे!

## आधी तपास करायचा की आरोपी सांभाळायचा? एका निर्णयाने अहिल्यानगर पोलिसांचे कंबरडे मोडले!

**दैनिक आकर्षण । विशेष प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** शासनाच्या एका अजब आणि तघलकी निर्णयाने अहिल्यानगर जिल्ह्यातील तालुका पोलीस यंत्रणेचे पुरते कंबरडे मोडले आहे. जिल्ह्यात गेल्या ४० वर्षांपासून सुरळीत सुरू असलेली १२ दुय्यम उपकारागृहे मागील महिन्यात अचानक बंद करण्यात आली. या एका निर्णयामुळे पोलीस प्रशासनाची प्रचंड दमछाक होत असून, आता तालुक्यातील प्रत्येक आरोपीला थेट नाशिक मध्यवर्ती कारागृहात पोहोचवण्यासाठी पोलिसांना तब्बल ३०० किलोमीटरची नाशिक वारी करावी लागत आहे. यामुळे ''आधी गुन्ह्याचा तपास करायचा की आरोपींना घेऊन नाशिकला पळायचं?'' असा संतप्त सवाल आता पोलीस कर्मचाऱ्यांमधून उपस्थित केला जात आहे.

**किरकोळ गुन्हा अन् नाशिकची वारी!**

ग्रामीण भागातील पोलीस ठाण्यात एखाद्या किरकोळ गुन्ह्यात जरी आरोपी अटक झाला आणि न्यायालयाने त्याला न्यायालयीन कोठडी सुनावली, तरी त्याला थेट नाशिक मध्यवर्ती कारागृहात न्यावे लागत आहे. एवढ्यावरच हे सोपस्कर संपत नाहीत, तर कोर्टाच्या पुढच्या



तारखेला त्याच आरोपीला पुन्हा नाशिकहून परत आणावे लागते. या एका आरोपीच्या प्रवासासाठी दोन पोलीस कर्मचारी, एक शासकीय वाहन आणि संपूर्ण दिवस वाया जात असल्याची व्यथा एका पोलीस अधिकाऱ्याने नाव न छापण्याच्या अटीवर मांडली. आधीच ग्रामीण भागातील पोलीस ठाण्यांमध्ये कर्मचारी संख्या कमी आहे. त्यातच रोज कर्मचारी नाशिकच्या फेऱ्या मारण्यात व्यस्त राहू लागल्याने गुन्ह्यांचे तपास चक्र थंडावले आहे. चोऱ्या, माऱ्यामाऱ्या आणि कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यास याला जबाबदार कोण? ■ पान ४ वर

# उद्योजक सोमनाथ वरखडेंचा राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये पक्षप्रवेश

## आ. दातेंच्या नेतृत्वात काम करणार



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पारनेर–** पारनेर तालुक्यातील निघोज परिसरात राष्ट्रवादी काँग्रेस (अजितदादा पवार गट) पक्षाच्या संघटनात्मक विस्ताराला मोठी चालना देणारी महत्त्वपूर्ण राजकीय घडामोड नुकतीच घडली. समाजाभिमुख भूमिका, विकासाची स्पष्ट दृष्टी आणि सर्वसामान्य जनतेच्या प्रश्नांसाठी सातत्याने संघर्ष करणारे पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते यांच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त करत उद्योजक सोमनाथ वरखडे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात जाहीर प्रवेश केला.

यावेळी आमदार दाते म्हणाले, ''राष्ट्रवादी काँग्रेस हा सामान्य जनतेच्या विश्वासाचा, विकासाचा आणि कार्यकर्त्यांच्या सन्मानाचा पक्ष आहे. पक्षात येणाऱ्या प्रत्येक कार्यकर्त्याला समान संधी आणि सन्मान देत समाजहिताच्या कामांना प्राधान्य दिले जाते. निघोज परिसरासह संपूर्ण मतदारसंघाच्या सर्वांगीण विकासासाठी आपण सर्वांनी एकदिलाने काम केले तर विकासाची गती आणखी ■ पान ४ वर

आमदार काशिनाथ दाते सर यांच्या विकासाभिमुख नेतृत्वामुळे आणि सर्वसामान्य कार्यकर्त्यांना न्याय देणाऱ्या कार्यपद्धतीमुळे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा जनाधार दिवसेंदिवस अधिक भक्कम होत आहे. उद्योजक सोमनाथ वरखडे यांचा पक्षप्रवेश हा दाते सरांच्या नेतृत्वावरील विश्वासाचा आणि पक्षाच्या वाढत्या ताकदीचा पुरावा आहे. निघोज गटात संघटन अधिक सक्षम करून प्रत्येक गावात विकासाची गती वाढविण्यासाठी आम्ही सर्वजण एकजुटीने कार्यरत राहू. आगामी काळात दाते सरांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेस अधिक जोमाने जनतेची सेवा करेल, असा मला पूर्ण विश्वास आहे.

– सौ. सुधामती कवाद
(जिल्हा कार्याध्यक्षा, राष्ट्रवादी काँग्रेस)

आमदार काशिनाथ दाते सर यांच्या विकासाभिमुख, सर्वसमावेशक आणि जनतेशी कायम जोडलेल्या नेतृत्वावर माझा पूर्ण विश्वास आहे. मतदारसंघातील प्रत्येक घटकाला न्याय देण्याची त्यांची कार्यपद्धती आणि सर्वसामान्यांसाठी सातत्याने केलेला संघर्ष यामुळेच मी राष्ट्रवादी काँग्रेस (अजितदादा पवार गट) परिवारात प्रवेश करण्याचा निर्णय घेतला. पुढील काळात आ. दाते सरांच्या नेतृत्वाखाली निघोज गटासह संपूर्ण मतदारसंघाच्या विकासासाठी पक्ष संघटना अधिक मजबूत करण्यासाठी पूर्ण ताकदीने काम करणार आहे.

– उद्योजक सोमनाथ वरखडे

# सोनम वांगचुक यांना जबरदस्तीने उचलून नेणारं मोदी सरकार डरपोक – किरण काळे

## नजीकच्या काळामध्ये भारताचा नेपाळ झाल्याशिवाय राहणार नाही, हा वनवा आता सरकार रोखू शकत नाही

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** नीट पेपर फुटी नंतर तब्बल वीस पेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्या. २१ जूनला झालेल्या फेर परीक्षेकडे तब्बल पावणेदोन लाख विद्यार्थ्यांनी नैराश्यातून पाठ फिरवली. देशातील तरुणाईच्या भवितव्याच्या सुरक्षिततेसाठी राजकारण विरहित राष्ट्रीय स्तरावरच आंदोलन दिल्लीमध्ये वैज्ञानिक तथा शिक्षण तज्ञ सोनम वांगचुक, अभिजीत दिपके यांच्यासह हजारो तरुणांनी उभं केलं आहे. त्यांच्या आमरण उपोषणाचा एकविसावा दिवस होता. मात्र आंदोलन चिरडण्यासाठी त्यांना जोर जबरदस्तीने उचलून नेत रुग्णालयात डांबण्यात आल आहे. वांगचुक यांना जबरदस्तीने उचलून नेणार मोदी सरकार हे डरपोक असल्याची टीका ठाकरे शिवसेनेचे महानगर प्रमुख किरण काळे यांनी केली आहे.



केंद्र सरकारच्या या कृतीमुळे देशभरामध्ये संतापाची लाट उसळली आहे. काळे म्हणाले, देशात लोकशाही उरलेली नाही. मागच्या वीस दिवसात सरकारचा एकही प्रतिनिधी साधा फिरकला सुद्धा नाही. आंदोलकांशी संवाद साधण्या ऐवजी दडपशाही केली जात आहे. तरुणाईचा आवाज बनलेले अभिजीत दिपके यांना झालेली मारहाण, आंदोलन स्थळी युवती आंदोलकांशी केलेले गैरवर्तन, विद्यार्थ्यांवर केलेला लाठीचार्ज यातून देशामध्ये नवा हिटलर जन्माला आला आहे हेच सिद्ध होते. सरकारची हीच भूमिका कायम राहिली तर नजीकच्या काळामध्ये भारताचा नेपाळ ■ पान ४ वर






## दै. आकर्षण निवडक

### शहरातून मार्गस्थ झालेल्या दिंडीतील वारकऱ्यांना पाणी व फराळाचे वाटप



अहिल्यानगर- महाराष्ट्राच्या सांस्कृतिक, धार्मिक आणि आध्यात्मिक परंपरेचे प्रतीक असलेली आषाढी वारी ही केवळ श्रद्धेची यात्रा नसून सेवाभाव, समर्पण आणि समाजातील एकात्मतेचे जिवंत उदाहरण आहे. ''ज्ञानोबा-तुकाराम''चा अखंड गजर करत लाखो वारकरी पायी पंढरपूरकडे मार्गक्रमण करतात. या भक्तांच्या सेवेसाठी दरवर्षी विविध सामाजिक संस्था आणि संघटना पुढाकार घेत असतात. याच सेवाभावी परंपरेचा वारसा जपत अहिल्यानगर लक्झरी बस असोसिएशन व ट्रॅव्हल्स असोसिएशन यांच्या वतीने यंदाही सलग तिसऱ्या वर्षी वारकरी बांधवांसाठी पिण्याचे शुद्ध पाणी व फराळाचे वाटप करण्यात आले. शहरातून मार्गस्थ झालेल्या दिंडीतील वारकऱ्यांनी याचा लाभ घेतला, या उपक्रमामध्ये पाच हजारांहून अधिक वारकरी बांधवांना सेवा देण्यात आली.श्री विठ्ठल-रुक्मिणी यांच्या प्रतिमेचे पूजन करून या अभियानाची सुरुवात करण्यात आली. दिंड्यांमधून येणाऱ्या वारकरी बांधवांवर पुष्पवृष्टी करून स्वागत करण्यात आले. यावेळी वातावरण भक्तिमय झाले होते. विठ्ठलाच्या नामस्मरणात तल्लीन झालेल्या वारकऱ्यांना प्रेमाने पिण्याच्या शुद्ध पाण्याच्या बाटल्या, बिस्किटे, वेफर्स, फराळी चिवडा आणि चिक्कीचे वाटप करण्यात आले. उन्हाचा तडाखा आणि दीर्घ पायी प्रवासामुळे थकलेल्या वारकऱ्यांसाठी हा अल्पोपहार मोठा दिलासा ठरला.या उपक्रमाचे विशेष वैशिष्ट्य म्हणजे असोसिएशनमधील सर्व गाडी मालक, चालक, पदाधिकारी आणि सदस्यांनी स्वतः उपस्थित राहून सेवा केली. आपल्या व्यावसायिक कामातून वेळ काढून सर्वांनी स्वतः वारकऱ्यांना पाणी व फराळ देत त्यांच्या सेवेत सहभाग घेतला. संस्थापक अध्यक्ष शिवाजी उबाळे यांच्या मार्गदर्शनाखाली गेल्या तीन वर्षांपासून हा उपक्रम सातत्याने राबविण्यात येत आहे. दरवर्षी हजारो वारकऱ्यांना सेवा देण्याची परंपरा यंदाही कायम ठेवण्यात आली. समाजाप्रती असलेली बांधिलकी आणि वारकरी संप्रदायाविषयी असलेला आदर याचे दर्शन या उपक्रमातून घडले. ''वारकऱ्यांची सेवा हीच खरी विठ्ठलाची सेवा'' या भावनेने सर्व पदाधिकारी आणि सदस्यांनी एकदिलाने काम केले.यावेळी अध्यक्ष शिवाजी उबाळे, उपाध्यक्ष (उपनगर) अमोल भांड, उपाध्यक्ष प्रमोद बेदमुथ्था, सेक्रेटरी रियाज मुलानी, खजिनदार गणेश गायकवाड, सचिव ईश्वर धोका, सहसचिव धर्मा वाघस्कर, प्रवक्ते सरवर कुरेशी, संघटक गणेश उपाध्ये व आपला मावळा महिला प्रदेशध्यक्षा ,प्रसिद्धी प्रमुख प्रियंका पाटील शेळके यांच्यासह असोसिएशनचे सर्व गाडी मालक, चालक आणि सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रत्येकाने आपापली जबाबदारी पार पाडत वारकऱ्यांना कोणतीही गैरसोय होणार नाही याची विशेष काळजी घेतली.



अहिल्यानगर जिल्हा बुद्धिबळ संघटनेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या तिसऱ्या नरेंद्र फिरोदिया चषक अखिल भारतीय क्लासिक आंतरराष्ट्रीय मानांकन बुद्धिबळ स्पर्धेमध्ये तल्लीन होऊन खेळताना खेळाडू.

## पूज्य प्रविणऋषीजी महाराज उद्या सारसनगर जैन स्थानकात



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** अहिल्यानगर शहरातील आनंदधाम येथे यंदा उपाध्यायश्री पूज्य प्रविणऋषीजी म.सा. यांचा समर्पण चातुर्मास २६ जुलै पासून सुरू होणार आहे. यानिमित्त शहरात समर्पण चातुर्मास धर्मयात्रा चालू आहे. या अंतर्गत पूज्य प्रविणऋषीजी महाराज यांचे रविवार दि. १९ जुलै २०२६ रोजी सकाळी ७ वाजता सारसनगर जैन स्थानकात मंगल आगमन होणार आहे. त्यांच्या सान्निध्यात दिवसभर विविध धार्मिक व आध्यात्मिक मार्गदर्शन कार्यक्रम होतील, अशी माहिती सारसनगर श्रावक संघाने दिली.

उपाध्याय श्री प्रविणऋषीजी महाराज महात्मा फुले चौक, सारसनगर जुना पूल, सुपेकर हॉस्पिटल, शिवगंगा टॉवर चौक मार्गे सारसनगर जैन स्थानकात दाखल होतील. या दरम्यान त्यांचे भव्य स्वागत करण्यात येणार आहे. अग्रभागी ऑर्गन बॅण्ड गाडी, २७ कलश मंडल, १४ स्वप्न मंडल, अर्हम विज्जा मंडल, अष्टमंगल मंडल, पाठशाळा मंडल व श्रावक श्राविका असतील.

स्थानक प्रवेशानंतर उपाध्यायश्रीजींचे सकाळी ७.३० ते ९ या वेळेत प्रवचन होईल. सकाळी ९.३० वाजता सर्वांसाठी नवकारसीची व्यवस्था करण्यात आली आहे. सकाळी ११ ते १२ यावेळेत लहान मुलांसाठी पाठशाळा, दुपारी ३ ते ४ दरम्यान महिलांसमवेत धर्म चर्चा, ४ ते ५ यावेळेत युवतींना मार्गदर्शन आणि रात्री ८ ते ९ यावेळेत उपाध्यायश्रीजी श्रावक आणि युवा वर्गाशी चर्चा करणार आहेत.



विद्यार्थ्यांच्या हक्कांसाठी शांततामय व लोकशाही मार्गाने आंदोलन करणारे सोनम वांगचुक यांच्या मागण्यांना पाठिंबा दर्शविण्यासाठी तसेच केंद्र सरकारने त्यांच्या मागण्यांची तातडीने दखल घ्यावी, या मागणीसाठी अहिल्यानगरात शुक्रवारी (दि. १७ जुलै) मौन कॅण्डल मार्च काढण्यात आला. याचे प्रारंभ वाडियापार्क येथील महात्मा गांधी यांच्या पुतळ्यास अभिवादन करुन करण्यात आले. या मार्चमध्ये युवक-युवतींसह सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. (छाया-वाजिद शेख-नगर)

## 'माऊली... माऊली'च्या अखंड गजरात बुरूडगाव पायी दिंडीचे पंढरपूरकडे प्रस्थान

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** नगर तालुक्यातील बुरूडगाव येथील पावन हनुमान मंदिर श्री क्षेत्र बुरूडगाव पायी दिंडीचे आषाढी वारीसाठी श्रीक्षेत्र पंढरपूरकडे अत्यंत भक्तिमय आणि उत्साहपूर्ण वातावरणात प्रस्थान झाले. गावातील प्रत्येक रस्ता विठ्ठलनामाच्या गजराने दुमदुमून गेला होता. ''ज्ञानोबा-तुकोबा'', ''माऊली... माऊली...'' या जयघोषात टाळ-मृदंगाचा निनाद, वारकऱ्यांचा उत्साह आणि भक्तीचा अविस्मरणीय संगम अनुभवायला मिळाला. पालखीभोवती दौडणाऱ्या अश्वाने उपस्थितांचे विशेष लक्ष वेधून घेतले, तर वैष्णवांच्या मेळ्याने संपूर्ण बुरूडगाव भक्तिरसात न्हाऊन निघाले.

वारकऱ्यांना सर्वाधिक सुविधा उपलब्ध करून देणारी आणि शिस्तबद्ध नियोजनासाठी ओळखली जाणारी बुरूडगाव पायी दिंडी यंदाही विशेष आकर्षण ठरली. दिंडी सोहळ्याच्या प्रस्थानप्रसंगी उद्योजक नरेंद्र फिरोदिया, गुणे आयुर्वेद महाविद्यालयाचे अध्यक्ष ॲड. सचिन जगताप, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, पोलीस निरीक्षक गणेश वारुळे, रोहन खंडागळे, माजी महापौर भगवान फुलसौंदर, शरद क्यादर , विशालशेठ पवार, उद्योजक संकेतभाऊ कुलट, सुभाष कुलट आदी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.



दिंडीचे प्रमुख संयोजक डॉ. संतोष यादव यांनी सर्व मान्यवरांचे स्वागत केले.

यावेळी समस्त बुरूडगाव ग्रामस्थ, नियोजन समितीचे, किशोर कुलट, जालिंदर कुलट, अक्षय लगड, नवनाथ वाघ, जालिंदर वाघ, बापू औताडे, अशोक जाधव, अविनाश जाधव, बाळासाहेब रकटे, दिगंबर कार्डिले, भाऊसाहेब कुलट, बाळसाहेब जाधव, नवनाथ मोकाटे, फारुख शेख, विष्णुदास जाधव, पांडू जाधव, राधाकिसन कुलट, शिवाजी मोढवे, बाळासाहेब मोढवे, गोवर्धन कामीनसे, जनजीवन माध्यमिक विद्यालय व जिल्हा परिषद शाळेचे शिक्षक-विद्यार्थी, आजी-माजी ग्रामपंचायत सदस्य, सरपंच, उपसरपंच, तलाठी, ग्रामसेवक तसेच बुरूडगाव आजी-माजी सैनिक संघटनेचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## स्नेहांकुर दत्तक विधायक केंद्रात कन्या दत्तक सोहळा भावनिक वातावरणात संपन्न

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** केडगाव येथील स्नेहांकुर दत्तक विधायक केंद्रात आयोजित करण्यात आलेला कन्या दत्तक सोहळा अत्यंत भावनिक आणि आनंददायी वातावरणात संपन्न झाला. सागर सहस्रबुद्धे आणि कीर्ती सहस्रबुद्धे या दाम्पत्याने चिमुकली दिव्या हिला दत्तक घेत तिच्या आयुष्यात आई-वडिलांच्या प्रेमळ नात्याचा सहवास दिला. या निर्णयामुळे सहस्रबुद्धे कुटुंबासाठी हा दिवस अविस्मरणीय ठरला असून उपस्थितांच्या डोळ्यांतही आनंदाश्रू दाटून आले.



समाजात मुलींबाबत सकारात्मक दृष्टिकोन निर्माण करण्यासोबतच अनाथ बालकांना प्रेमळ कुटुंब मिळावे, या भावनेतून झालेला हा दत्तक सोहळा अनेकांसाठी प्रेरणादायी ठरला. एका अनाथ चिमुकलीला आपलेसे करून सहस्रबुद्धे दाम्पत्याने मानवतेचा आणि सामाजिक बांधिलकीचा आदर्श समाजासमोर उभा केला.

यावेळी महावीर ग्रुपचे उद्योजक राजेश भंडारी म्हणाले की, मुली आज शिक्षण, विज्ञान, उद्योग, प्रशासन, क्रीडा आणि संरक्षण क्षेत्रासह प्रत्येक क्षेत्रात यशाची नवी शिखरे गाठत आहेत. देशाच्या जडणघडणीत आणि प्रगतीत त्यांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे.

अशा परिस्थितीत एका अनाथ मुलीला दत्तक घेऊन तिच्या आयुष्याला नवे वळण देण्याचा सागर व कीर्ती सहस्रबुद्धे यांचा निर्णय समाजासाठी आदर्शवत आहे. दत्तक प्रक्रियेमुळे केवळ एका बालिकेला कुटुंब मिळत नाही, तर समाजात मानवता, संवेदनशीलता आणि सामाजिक जबाबदारीची जाणीवही अधिक दृढ होत असल्याचे त्यांनी सांगितले.

केडगाव येथील स्नेहांकुर दत्तक विधायक केंद्रात झालेल्या या सोहळ्यास स्नेहालयचे संस्थापक गिरीश कुलकर्णी, महावीर ग्रुपचे उद्योजक राजेश भंडारी राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष सुरज कोतकर, सागर सहस्रबुद्धे, कीर्ती सहस्रबुद्धे, विनायक सहस्रबुद्धे, रूपाली मुनोत, वैशाली चोपडा, बाळासाहेब वारुळे, राजीव गुजर, राजीव सिंग, दिनेश मुनोत यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

दत्तक प्रक्रियेचे सर्व विधी पूर्ण होताच उपस्थितांनी टाळ्यांच्या कडकडाटात सहस्रबुद्धे दाम्पत्याचे अभिनंदन केले.

## प्रत्येकाने नात्यांमध्ये समर्पण भाव ठेवला पाहिजे - पूज्य प्रविणऋषीजी म.सा.

### पू. कुंदनऋषीजी महाराज, पू.प्रविणऋषीजी महाराज यांची सथ्था कॉलनी येथे आशीर्वादपर भेट

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** अहिल्यानगर शहरातील आनंदधाम येथे आयोजित समर्पण चातुर्मासाची उत्कंठा वाढली असून दि.२६ जुलै पासून चार महिने समर्पण, अध्यात्म, जप, तप, आत्मोन्नतीची दिशा दर्शवणारे अद्भुत मार्गदर्शन मिळणार आहे. यानिमित्त शहरात समर्पण धर्मयात्रा सुरू आहे. महाराष्ट्र प्रवर्तक पूज्य कुंदनऋषीजी म.सा. , अर्हम विज्जा प्रणेता उपाध्याय पूज्य प्रविणऋषीजी म.सा. (आदी ठाणा ४) यांनी सथ्था कॉलनी येथील राजमल आदेश चंगेडिया यांच्या संभव निवासस्थानी आशीर्वादपर भेट दिली. त्यांच्या समवेत पूज्य आलोकऋषीजी म.सा., पूज्य तीर्थे ऋषीजी म.सा. उपस्थित होते. गुरूदेवांचे पावन दर्शन आणि आशीर्वाद घेण्यासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती.

यावेळी आयुर्वेद शास्त्र मंडळाचे अध्यक्ष ॲड. सचिन जगताप, महापौर ज्योतीताई गाडे, समर्पण चातुर्मास समितीचे सर्व पदाधिकारी व सदस्य तसेच सथ्था कॉलनीतील अनिल पोखरणा, राजेंद्र चोपडा, वसंत पोखरणा, आनंदराम मुनोत, गिरीश अग्रवाल, संजय गुगळे, विजय गुगळे, नरेंद्र लोहाडे, शरद मुनोत, कमलेश मुनोत, आनंद गांधी, रोहित मुनोत, पवन गांधी, सचिन मुनोत, नरेश मुनोत, कुणाल गुगळे, विपुल गुगळे, विनय बोगावत, अमित पोखरणा, केतन मुनोत, आलोक मुनोत आदी उपस्थित होते. सथ्था कॉलनी महिला मंडळाने गुरूदेवांचे अतिशय सुंदर पद्धतीने भव्य स्वागत केले.

प्रवचनात पूज्य प्रविणऋषीजी महाराज म्हणाले, याठिकाणी आगामी चातुर्मास सजावटीचे सुंदर प्रतिबिंब पहायला मिळाले.



आदेश चंगेडिया स्वतः जाहिरात क्षेत्रात असल्याने त्यांना सौंदर्य दृष्टी आहे. त्याची प्रचिती सथ्था कॉलनीत पहायला मिळाली. यंदाचा चातुर्मास पूज्य कुंदनऋषीजी महाराज यांच्या समर्पणाने होत आहे हे आवर्जून नमूद करतो. त्यांचे आशीर्वाद कायम सोबत राहिले आहेत. आयुष्यात समर्पण खूप महत्वाचे आहे. महाभारतात दुर्योधनाकडे समर्पण नव्हते, म्हणून तो पराजित झाला. अर्जुन भगवान श्रीकृष्णाप्रती समर्पित होता. पंढरपूरला पांडुरंगाच्या दर्शनासाठी जाणारा वारकरी समर्पित असतो, त्यामुळे तो उन वारा पावसाची तमा बाळगत नाही. मी आचार्यश्रींच्या पावन भूमीत समर्पणासाठी आलों आहे. भगवान से भक्ती नहीं होती, भक्तीसे भगवान मिलता है. मनुष्याने आपल्या नात्यांमध्येही समर्पण भाव ठेवला पाहिजे. समर्पण करणारांना भगवंताकडे काही मागण्याची गरज नसते. ज्या नात्यात मागणे आहे ते जास्त टिकत नाही. नात्यात अधिकाराची भाषा सुरू होते तेव्हा नाते गोत्यात आणतात हे सगळ्यांनी लक्षात ठेवावे.

पूज्य कुंदनऋषीजी महाराज म्हणाले, उपाध्याय प्रविणऋषीजी महाराज यांचे अहिल्यानगर येथील आगमन खूप आनंददायी आहे. आदेश चंगेडिया यांनी भक्तीभावाने आम्हाला सर्वांना सथ्था कॉलनीत निमंत्रित केले. राजमल आदेश चंगेडिया यांच्या निवासस्थानी मी यापूर्वीही भेट दिली होती. या परिवाराचा भक्तीभाव प्रसन्न करणारा असल्याने याठिकाणी येऊन समाधान लाभते. उपाध्यायश्रीजी व आमच्यात खूप गहिरे नाते आहे. त्यांना सर्वांनीच उपाध्यायश्रीजी नावानेच संबोधित करावे. ते शास्त्र पारंगत असून आपल्या प्रवचनातून मौलिक संदेश देत असतात. चातुर्मासात त्यांच्या मार्गदर्शन प्रवचनाचा सर्वांनी मोठ्या संख्येने लाभ घ्यावा. त्यांचे प्रवचन जीवनाला दिशा देणारे ठरेल.

ॲड. सचिन जगताप, महापौर ज्योतीताई गाडे यांनी नगरमधील समर्पण चातुर्मास सर्वांसाठी मोठी धार्मिक पर्वणी असल्याचे सांगत या कालावधीत आवश्यक ते सर्व सहकार्य करण्याची ग्वाही दिली.

सुरूवातीला राजेंद्र चोपडा यांनी सथ्था कॉलनीतील सर्व परिवारांच्या वतीने गुरूदेव आणि उपस्थित भाविकांचे स्वागत केले.

## शब्दकोडे क्रमांक : ९



**आडवे शब्द :** १.देवतांना केलेली आवळणी, प्रार्थना ३.लोभी ५. मनन ७.पंथ ८.संजय दत्त सिनेमा ९.एक नक्षत्र ११.पोपट १२.मिथुन चक्रवती यांचा एक चित्रपट १४.एक हिंदी सिनेमा ** दिलदारा १६.प्रामाणिकपणा १९.रुबाब २०.दणकट २१.जगातील सर्वात प्रसिद्ध धबधबा २४.तडक २६.इंग्लिशमध्ये-पैसे २८.पठण २९.कुटील डाव ३१.खारट ३२. रायगडावरील एक डोंगरकडा ३५.धोबी ३८.वन ३८.चारपाई ४१.लाज ४५. नौका ४६. भारतातील एक प्रसिद्ध राजा ४९.वाहन चालवणारा ५१.घुंगरू ५२.अधिक ५३.हिंदीत-इज्जत

**उभे शब्द :** १.विश्राम २.इंग्रजीत- मध ३.हस्त ४.एक तोंडी लावण्याचा पदार्थ ५.विस्तव-हिंदीत ६. जहाज ७.मुलीचा नवरा १०.जखमी १२.नि:स्वार्थ दिलेली देणगी १३.घनदाट १५.दणकट १७.एक मराठी महिना १८ एक पेय १९.जागा २०.सुक्या मेव्यातील एक पदार्थ २१.नाट्य २२.भेट २३.वाचन करणारा २५.दहा आणि तीन मिळून तयार होणारी संख्या २७.व्यवस्थित २८.ब्राह्मण ३०.उलट लिहा-पट ३१.चारपाई ३३.जादू ३४.बट्टा ३६.धाग्याची गुंडी ३७.पत्ते ४०.गुंतागुंतीचा ४२.रसरशीत ४३.सोबत ४४.धनी ४७.एक सुगंधी वनस्पती ४८.आकाश ५०.हिंदीत-उंची

### शब्दकोडे क्रमांक : ८ चे उत्तर

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| वि | न | य | ■ | ख | त | ■ | शं | ■ | का | ल | वा |
| हं | ■ | म | ह | ल | ■ | प | ख | वा | ज | ■ | दी |
| ग | ड | ■ | ल | ■ | ता | रा | ■ | ह | ळ | वा | ■ |
| ■ | ब | क | वा | स | ■ | गं | ध | क | ■ | द | र |
| सं | के | त | ■ | खा | स | दा | र | ■ | मा | ळ | ■ |
| सा | ■ | ल | ढा | ■ | म | ■ | प | त | न | ■ | घे |
| र | मा | ■ | ल | त | ■ | पा | क | ळी | ■ | मी | रा |
| ■ | ती | ल | ■ | री | स | ■ | ड | रा | व | ■ | व |
| म | ■ | हा | क | ■ | जा | डा | ■ | म | ■ | छं | ■ |
| स | द | न | ■ | ता | ■ | वा | री | ■ | उ | द | र |
| ला | ख | ■ | डा | ल | डा | ■ | घ | रा | णे | ■ | क |
| ■ | ल | क | ब | ■ | स | र | ■ | ग | ■ | दा | म |

आकर्षण हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी दैनिक आकर्षण प्रिंटर्स , प्लॉट क्र. ९२, भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस- प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक विजय शामराव सांगळे, व्यवस्थापक तुकाराम कामटे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर - ७७७६८१२८११. ई-मेल: dainikaakarshan@gmail.com. (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)

The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at DAINIK AKARSHAN PRINTERS, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). "Editor - Vijay Shamrao Sangale, Manager - Tukaram Kamte, Phone no. of main office-7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com ("The responsibility under the PRB Act will be on him.)

## दै. आकर्षण निवडक

### अहिल्यानगरात आमदार अमित गोरखे यांचे मातंग समाजाकडून स्वागत



अहिल्यानगर - अनुसूचित जातींच्या उपवर्गीकरणाच्या समर्थनार्थ शहरात आयोजित करण्यात आलेल्या भव्य मोर्चासाठी विधान परिषदेचे आमदार अमित गोरखे हे अहिल्यानगरात दाखल झाले असता, हिंदू मातंग समाजाच्या वतीने त्यांचे उत्स्फूर्त स्वागत व सत्कार करण्यात आला. सामाजिक न्यायाच्या लढ्यात त्यांनी घेतलेल्या ठाम भूमिकेचा गौरव करत समाजबांधवांनी त्यांना क्रांतिगुरू लहुजी वस्ताद साळवे यांची प्रतिमा भेट देऊन सन्मानित केले. स्वागत समारंभात उपस्थित युवकांनी घोषणाबाजी करत सामाजिक न्याय, समता आणि संविधानिक हक्कांच्या लढ्याला बळ देण्याचा निर्धार व्यक्त केला. अनुसूचित जातींच्या उपवर्गीकरणाच्या मागणीसाठी सुरू असलेल्या आंदोलनाला आमदार अमित गोरखे यांनी सातत्याने पाठिंबा दिल्याबद्दल समाजातील विविध स्तरातून त्यांचे अभिनंदन करण्यात आले. यावेळी सामाजिक कार्यकर्ते सुभाष वाघमारे, पंडितजी खुडे, केतकी ग्रामपंचायतीचे उपसरपंच प्रकाश घोरपडे, अहिल्यानगर उत्तर भाजप जिल्हाध्यक्ष नितीन दिनकर, महा भारत न्यूजचे संपादक भारत पवार, नवनाथ वाल्हेकर, प्रकाश वाघमारे, जय नेटके यांच्यासह हिंदू मातंग समाजाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांनी क्रांतिगुरू लहुजी वस्ताद साळवे यांच्या सामाजिक कार्याचा आणि समाजजागृतीतील योगदानाचा गौरवपूर्ण उल्लेख केला. समाजातील वंचित घटकांना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात न्याय्य प्रतिनिधित्व मिळण्यासाठी अनुसूचित जातींचे उपवर्गीकरण ही काळाची गरज असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले. उपस्थित समाजबांधवांनी उपवर्गीकरणाच्या मागणीसाठी होणाऱ्या पुढील आंदोलनांमध्ये मोठ्या संख्येने सहभागी होण्याचा निर्धार व्यक्त केला.

### श्री रेणुका ट्रॅव्हल्सतर्फे ऑगस्टपासून विविध सहलींचे आयोजन

अहिल्यानगर - येथील श्रीरेणुका ट्रॅव्हल सर्व्हिसेस यात्रा कंपनीने खास लोकाग्रहास्तव ऑगस्ट महिन्यापासून विविध सहलींचे आयोजन केले आहे. यामध्ये अष्टविनायक, कोकण, ११ मारुती तसेच जगन्नाथपुरी, पिठापुरम, केरळ, नेपाळ, राजस्थान सहलींचा समावेश आहे, अशी माहिती संचालिका सौ. शुभांगी क्षीरसागर यांनी दिली. दि. १८ ते २० ऑगस्ट दरम्यान तीन दिवस होत असलेल्या अष्टविनायक दर्शन यात्रा सहलीमध्ये अष्टविनायक दर्शनासह देहू, आळंदी तीर्थक्षेत्री भेट देता येणार आहे. दि. ४ ते ९ सप्टेंबर दरम्यानच्या ६ दिवसांच्या यात्रेत पाली, हरिहरेश्वर, दिवे आगार, मुरुड जंजिरा, रत्नागिरी, गणपतीपुळे, पावस, आरे-वारे बीच, मार्लेश्वर, कोल्हापूर आदि ठिकाणी भेट देण्यात येणार आहे. ११ मारुती दर्शन यात्रा दि. २५ ते २७ डिसेंबर २०२६ आणि २२ ते २४ फेब्रुवारी २०२७ अशी प्रत्येकी तीन दिवसांची दोन वेळा होणार आहे. यामध्ये श्री समर्थ रामदास स्वामी स्थापित ११ मारुती दर्शनासह नरसोबाची वाडी, मोरगाव आदि ठिकाणे सहभागितांना पाहण्यास नेले जाईल.एक आठवड्यापेक्षा जास्त कालावधीसाठी होणार्या जगन्नाथपुरी (गंगासागर दर्शन), पिठापुरम, केरळ, नेपाळ, राजस्थान यात्रांसाठी बुकींग सुरू झाले आहे. या यात्रा रेल्वेने होणार आहेत. जगन्नाथपुरी यात्रेत पर्यटकांना कलकत्ता, गंगासागर, भुवनेश्वर, कोणार्क, साक्षी गोपाल, चिलका सरोवर तसेच पिठापुरम दर्शन यात्रेत पिठापुरम, कुरवपुरम, द्राक्षाराम, राजमुंद्री, अन्नावरम, काकीनाडा, विजयवाडा, श्रीशैलम आदि ठिकाणे पर्यटकांना पाहता येतील. जगन्नाथपुरी यात्रा २४ ऑक्टोबर ते १ नोव्हेंबर २०२६ दरम्यान ९ दिवसांची आहे. बुकींग अंतिम तारीख १० ऑगस्ट आहे. पिठापुरम यात्रा २१ ते ३० नोव्हेंबर अशी १० दिवस होत असून, याची बुकींग अंतिम तारीख १ सप्टेंबर आहे. केरळ, नेपाळ व राजस्थान या यात्राही रेल्वेनेच होत आहेत. केरळ यात्रेत मुन्नार, थेक्कडी (पेरिवार), मदुराई, रामेश्वर, कन्याकुमारी, सुचिंद्रम, तिरुअंतपुरम, आलेप्पी (बॅकवॉटर) पर्यटकांना पाहता येतील. नेपाळ यात्रेत प्रयागराज, अयोध्या, वाराणसी, गोरखपूर, लुंबिनी, पोखरा, सोनोली बॉर्डर, काठमांडू, मनोकामना देवी, चितवण, पशुपतीनाथ, जनकपुरी, सितामढी तर राजस्थान यात्रेत जोधपूर, जैसलमेर, जयपूर, बिकानेर, पुष्करातिर्थ, चितोडगड, उदयपूर, माऊंटअबू, खाटुश्याम, सालासर बालाजी आदि ठिकाणांचा समावेश आहे. केरळ यात्रा ५ ते १८ डिसेंबर अशी १४ दिवसांची आहे. नेपाळ यात्रा ३० डिसेंबर २०२६ ते ११ जानेवारी २०२७ अशी १३ दिवसांची तर राजस्थान यात्रा ३१ जानेवारी ते १३ फेब्रुवारी २०२७ दरम्यान १४ दिवसांची आहे.

## इनामवस्ती शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षपदी सुजाता शिंदे यांची बिनविरोध निवड



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पारनेर–** जिल्हा परिषद प्राथमिक शाळा इनामवस्तीमाळकुप येथील शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षपदी सौ. सुजाता शिवशंकर शिंदे यांची बिनविरोध निवड करण्यात आली. तर उपाध्यक्षपदी श्री. सुधीर गवळी यांना कायम ठेवण्यात आले असून, शिक्षक तज्ञ म्हणून श्री. मधुकर भागाजी शिंदे यांची नव्याने निवड करण्यात आली.

नवनिर्वाचित अध्यक्षा सौ. सुजाता शिंदे यांनी अध्यक्षपद स्वीकारल्यानंतर शाळेच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध राहण्याचा निर्धार व्यक्त केला. गुणवत्तापूर्ण शिक्षण, विद्यार्थ्यांची नियमित उपस्थिती, स्वच्छ व सुरक्षित शालेय वातावरण, शाळेतील मूलभूत सुविधा, शासनाच्या विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी तसेच पालक, शिक्षक आणि ग्रामस्थ यांच्या सक्रिय सहभागातून आदर्श शाळा उभारण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी सांगितले. ''ज्ञान, संस्कार आणि गुणवत्ता'' या त्रिसूत्रीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या उज्वल भविष्यासाठी सातत्याने कार्य करण्याची ग्वाहीही त्यांनी दिली.

यावेळी नवनिर्वाचित अध्यक्षा सौ. सुजाता शिंदे तसेच मावळत्या अध्यक्षा सौ. विजया जयसिंग नाबगे यांचा ग्रामस्थांच्या वतीने शाल व श्रीफळ देऊन सन्मान करण्यात आला.

या प्रसंगी माळकुप गावचे सरपंच संजय काळे, नितीन चत्तर, किरण शिंदे, माजी उपसरपंच अरुण गवळी, वैभव शिंदे, सदाशिव शिंदे सर, गणेश शिंदे सर, एकनाथ डेरंगे, प्रणव राहींज, सेवा सोसायटीचे संचालक संभाजी नाबगे, किरण लेंडे, संदिप शिंदे, कविता साठे मुख्याध्यापिका सुनिता शिरसीम तसेच शिक्षिका जयश्री कातोरे यांच्यासह ग्रामस्थ, पालक आणि समिती सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

''शाळा घडली तर गाव घडेल, आणि गाव घडले तर राष्ट्र सक्षम बनेल,'' या विश्वासाने नव्या नेतृत्वाखाली शाळेच्या प्रगतीला नवी दिशा मिळेल, असा आशावाद यावेळी उपस्थितांनी व्यक्त केला.

> **''जिल्हा परिषद प्राथमिक शाळा ही आपल्या गावाच्या उज्वल भविष्यासाठी महत्त्वाची संस्था आहे. शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षपदी सौ. सुजाता शिवशंकर शिंदे यांची झालेली निवड निश्चितच स्वागतार्ह असून त्यांचे मन:पूर्वक अभिनंदन करतो. ग्रामपंचायतीच्या वतीने शाळेच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक ते सहकार्य कायम राहील. शिक्षक, पालक, समिती आणि ग्रामस्थ यांच्या एकत्रित प्रयत्नातून आपल्या शाळेला आदर्श शाळा म्हणून नवी ओळख मिळेल, असा मला विश्वास आहे.''**
>
> **- संजय काळे (सरपंच, माळकुप)**

> **''शाळा व्यवस्थापन समिती ही शाळेच्या विकासातील महत्त्वाचा दुवा आहे. नवनिर्वाचित अध्यक्षा सौ. सुजाता शिवशंकर शिंदे यांच्या नेतृत्वाखाली शाळेच्या शैक्षणिक गुणवत्ता व सर्वांगीण विकासाला निश्चितच नवी दिशा मिळेल, असा विश्वास आहे. शिक्षक, पालक, समिती आणि ग्रामस्थ यांच्या समन्वयातून विद्यार्थ्यांच्या हितासाठी अधिक प्रभावीपणे कार्य करू. नव्या समितीला मन:पूर्वक शुभेच्छा.''**
>
> **- सौ. सुनिता शिरसीम**
> **(मुख्याध्यापिका, जि.प.शाळा इनामवस्ती - माळकुप)**

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या जन्मदिनानिमित्त ५५६ झाडे लावण्याचा संकल्प

### पंडित दीनदयाळ परिवार प्रतिष्ठान व अनुलोम संस्थेचा अनोखा उपक्रम

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या जन्मदिनानिमित्त पंडित दीनदयाळ परिवार प्रतिष्ठान व अनुलोम संस्थेच्या वतीने शहरात विविध ठिकाणी ५५६ झाडे लावण्यात येणार आहेत. याचाच एक भाग म्हणून धार्मिक परीक्षा बोर्ड आनंदऋषीजी मार्ग या परिसरामध्ये दहा देव वृक्षांची झाडे लावण्यात आले आहेत. तसेच झाडांचे संरक्षण व्हावे. यासाठी ट्री गार्ड ही बसविण्यात आले आहेत. दीनदयाळ परिवाराचे कार्याध्यक्ष सुरज अग्रवाल यांच्या संकल्पनेतून वृक्षारोपण करण्यात आले आहे.तसेच या झाडांचे संगोपन व्हावे संवर्धन व्हावे यासाठी परिसरातील नागरिकांनी झाडे दत्तक घेऊन झाडांची निगा राखून संवर्धन करण्यासाठी जबाबदारी घेतली आहे.येथे लावण्यात आलेली पर्यावरणपुरक देववृक्ष परिसराला निरोगी व आरोग्यदायी वातावरण निर्माण करतील.असे प्रतिपादन भाजपचे ज्येष्ठ नेते तथा पंडित दीनदयाळ परिवार प्रतिष्ठानचे संस्थापक वसंत लोढा यांनी केले आहे.

पंडित दीनदयाळ परिवार प्रतिष्ठान ट्रस्ट व अनुलोम संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने देववृक्ष लागवड व संवर्धन अभियानांतर्गत धार्मिक परीक्षा बोर्ड,आनंदऋषीजी मार्ग येथे केशर गुलाब जवळ कडूलिंबा,करंजी,वड,जांभूळ,आवळा,सोनचाफा,बहावा या देववृक्षांचे वृक्षारोपण करण्यात आले.याप्रसंगी पंडित दीनदयाळ परिवार प्रतिष्ठानचे संस्थापक वसंत लोढा,अध्यक्ष धनंजय तागडे,सचिव बाळासाहेब भुजबळ,उपाध्यक्ष अशोक कानडे,उद्योजक मनीष सोमानी, संदेश लोढा,अनुराग धूत, प्रीतम मुथा,राहुल जामगावकर,महावीर कांकरिया अनुलोम संस्थेचे दीपक रोहोकले,अमोल अवस्थी,निलेश चिपाडे,उदय अनुभुले मॉर्निंग ग्रुप जेष्ठ नागरिक चंद्रभानशेट अग्रवाल,संजय वखारिया,नंदकुमार मेहेर, हिम्मतलाल शिंगी,जीवन मुनोत,अशोक गांधी,दिलीप गुगळे,पारस कांकरिया,सुभाष मुनोत,दिलीप गुंदेचा,राजू लुनिया,मिलाफ पटवा,दीपक गांधी,सचिन डुंगरवाल, दिलीप धोखा,अँड.शशिकांत गांधी,सुरेश कटारिया, परिसरितील नागरिक ह.भ.प.विश्वनाथ महाराज राउत अण्णा, श्री.फुलसौंदर, सुभाषशेट पोखरणा, जीतू पोरवाल,दिलीप बोरा, जगदीश दरक,रितेश कोठारी, अमोल पोखरणा, श्रीमती शैला गांधी यांचे विशेष सहकार्य लाभले.

## शिलाविहारला गोंदवलेकर महाराज मंदिरात गुरु पौर्णिमेनिमित्त अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** सावेडी उपनगरात शिलाविहार येथील श्री. ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज मंदिरात गुरुपौर्णिमेनिमित्त बुधवार दि.२२ जुलैपासून अखंड हरिनाम सप्ताह आणि श्रीमद् भागवत कथा याचे आयोजन करण्यात आले आहे. अशी माहिती हभप श्री.सुंदरदास रिंगणे यांनी दिली. या सप्ताहात २४ तास अखंड नामजप तसेच श्रीं चे ग्रंथ वाचन पारायण सोहळा सकाळी ९ ते ११ या वेळेत व्यासपीठ चालक सौ.मनीषा भोंग पारायण वाचन करणार आहेत. हभप धनंजय महाराज क्षीरसागर भागवत कथा सांगणार असून दररोज दुपारी ३ ते ६ या वेळेत ही कथा होईल.अखंड नामजपासाठी दर एक तासाला भाविक बसणार आहेत. या सप्ताहात पहाटे रुद्राभिषेक, सकाळी ग्रंथ वाचन,दुपारी महाआरती होऊन महाप्रसाद होईल. सायंकाळी हरिपाठ व रात्री पंचपदी भजन असे कार्यक्रम होणार आहेत. याचा लाभ परिसरातील भाविकांनी घ्यावा.

## मतदार यादीची सखोल पुनरिक्षण मोहीमेस कार्यकर्ते व बुथप्रमुखांनी योगदान द्यावे – पालकमंत्री

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**




**शेवगाव–** मतदार यादीची सखोल पुनरिक्षण मोहीम भविष्याच्या दृष्टीने महत्वपूर्ण आहे.सरकारी स्तरावर काम सुरू असले तरी संघटनात्मक पातळीवर कार्यकर्ते आणि बुथप्रमुखांनी यामध्ये योगदान देण्याचे आवाहन जलसंपदा तथा पालक मंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले. पाथर्डी शेवगाव विधानसभा मतदार संघातील मतदार यादी सखोल पुनरिक्षण मोहीमेचा आढावा मंत्री विखे पाटील यांनी जाणून घेतला.आ.मोनिका राजळे भाजपाचे जिल्हाध्यक्ष दिलीप भालसिंग विनायक देशमुख यांच्यासह या मोहीमेसाठी नियुक्त करण्यात आलेले पक्षाचे प्रतिनिधी कार्यकर्ते उपस्थित होते.उपस्थित प्रतिनिधींनी विचारलेल्या प्रश्नांचे निरसन प्रांताधिकारी प्रसाद मते यांनी केले.

आतापर्यत मतदार संघात १लाखम७१ हजार अर्जाचे वितरण झाले आहे.आता अर्ज भरून घेण्याच्या कामाला गती द्यावी लागेल. सरकारी यंत्रणेच्या एक पाउल पुढे जावून संघटनात्मक स्तरावर अधिक काम करण्याचे आवाहन त्यांनी केले.

संपूर्ण देशातील २२राज्यात ही मोहीम सुरू असल्याचे नमूद करून मंत्री विखे पाटील म्हणाले की,या मोहीमेमुळे कोणत्याही मतदारावर अन्याय होणार नाही.दुबार मतदार आणि मतदार यादीत खोटी माहीती देवून नाव टाकलेल्या व्यक्तीची नाव कमी करण्याची संधी आहे.

पश्चिम बंगाल मध्ये मोहीम राबविल्यामुळे मतदार यादीतील घुसखोर उघडे पडले. निवडणूक प्रक्रीयेत गुंडगिरी दहशत करून अराजक निर्माण करण्याचे काम वर्षानुवर्ष सुरू होते.याद्यांचे पुर्नरिक्षण झाल्यामुळे ९१लाख मतदारांची नाव कमी झाल्याचे त्यांनी सांगितले. मतदार यादीत २००२ पासून नावाचा समावेश असणे आवश्यक आहे.स्थानिक पातळीवरील आपल्या गावात प्रभागात आणि बुथवर लक्ष केंद्रीत करून ही प्रक्रीया यशस्वी करण्याची जबाबदारी पदाधिकारी कार्यकर्ते आणि बुथ स्तरावर काम करणार्या प्रत्येकाची असल्याचे मंत्री विखे पाटील यांनी सांगितले.

मतदार सखोल पुनरिक्षण मोहीमेचा फायदा तुम्हाला भविष्यात दिसेल.कारण ही मोहीम परत कधी होईल माहीत नाही त्यामुळे आताच गांभीर्यपुर्वक मोहीमेत योगदान देण्याचे आवाहन मंत्री विखे पाटील यांनी केले.

**महाराष्ट्राचा लाडका कवी २०२६ स्पर्धेतील विजेते**

## कविवर्य दत्तात्रय वारकड यांना प्रथम क्रमांकाचा पुरस्कार जाहीर

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** काव्ययोग काव्यसंस्था,पुणे यांच्या वतीने ''महाराष्ट्राचा लाडका कवी २०२६'' स्पर्धे चे आयोजन करण्यात आले होते.या स्पर्धेत महाराष्ट्रातील १८७ कवींनी भाग घेतला होता.या स्पर्धेत अहिल्यानगर येथील कविवर्य दत्तात्रय वारकड यांनी संत ज्ञानेश्वर माऊली यांच्या जीवन प्रवास वर्णन करणारी ,''ज्ञानज्योत'' स्वरचित काव्य सादर केले.

या ऑनलाइन स्पर्धेला कवी दत्तात्रय वारकड यांना ९७०० व्हिवज् मिळाले.असून १४०० लाईक तर ४०५ कमेंट मिळाले आहेत.महाराष्ट्रात सर्वाधिक मते व कवितेला मोठ्या प्रमाणात पसंती मिळाल्याने काव्ययोग काव्यसंस्थेच्या वतीने कविवर्य दत्तात्रय वारकड यांना महाराष्ट्राचा लाडका कवी स्पर्धेत प्रथम पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.

या कवितेला रसिक प्रेक्षकांचा भरभरून प्रतिसाद मिळाला.या कवितेला लेखक, कवि, साहित्यिक क्षेत्रातील, डॉक्टर, वकील राजकीय मंडळी, नगरसेवक, महापौर ,उपमहापौर, पत्रकार विविध क्षेत्रातील मान्यवरांनी कवितेला उत्कृष्ट अभिप्राय दिले आहे. तसेच रशिया, दुबई ,मुंबई ,बिहार, गुजरात, महाराष्ट्र या ठिकाणच्या व्यक्तींकडून कवितेला सुंदर असे अभिप्राय आले आहेत.

या पुरस्कारामुळे अहिल्यानगर जिल्ह्याला बहुमान मिळाला आहे.या यशाबद्दल कवी दत्तात्रय वारकड यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

**दमदार पावसाने खरीपला संजीवनी**

## बाजरी, कापूस, सोयाबीन पिकांना मोठा दिलासा

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण–** गेल्या काही दिवसांपासून पावसाने दडी मारल्याने चिंतेत सापडलेल्या पैठण तालुक्यातील शेतकऱ्यांना बुधवारी मध्यरात्री झालेल्या दमदार पावसाने मोठा दिलासा दिला आहे. या पावसामुळे बाजरी, कापूस, सोयाबीन, मका तसेच इतर खरीप पिकांना नवसंजीवनी मिळाली असून शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर पुन्हा समाधान फुलले आहे.

सततच्या उघडीपीमुळे पिकांची वाढ खुंटण्याची भीती निर्माण झाली होती. अनेक ठिकाणी पिके कोमेजू लागल्याने शेतकरी चिंतेत होते. मात्र रात्री झालेल्या पावसामुळे शेतांमध्ये पुन्हा ओलावा निर्माण झाला असून पिकांच्या वाढीस पोषक वातावरण तयार झाले आहे. त्यामुळे खरीप हंगामाबाबत शेतकऱ्यांच्या अपेक्षा पुन्हा उंचावल्या आहेत.

यंदाच्या हंगामात वेळेवर आणि नियमित पाऊस झाल्यास उत्पादनात चांगली वाढ होईल, असा विश्वास शेतकऱ्यांनी व्यक्त केला आहे. दरम्यान, आगामी काळातही अशीच पावसाची साथ कायम राहावी, अशी अपेक्षा शेतकरी व्यक्त करत आहेत.

## शुक्लेश्वर मंदिरात गंगामैया पायी दिंडीचे भक्तिमय स्वागत; वारकऱ्यांसाठी महाप्रसादाचे आयोजन

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** श्रीक्षेत्र भेर्डापूर ते श्रीक्षेत्र पंढरपूर असा विठ्ठल नामाचा अखंड गजर करीत मार्गक्रमण करणाऱ्या गंगामैया पायी दिंडी सोहळ्याचा भिंगार येथील प्राचीन श्री शुक्लेश्वर मंदिरात मुक्काम झाला. यानिमित्त श्री शुक्लेश्वर देवस्थान, शुक्लेश्वर आरती मंडळ, शुक्लेश्वर भजनी मंडळ तसेच मंदिरातील सेवेकरी आणि भाविकांच्या वतीने दिंडीचे उत्साहात स्वागत करण्यात आले.

दिंडीच्या मुक्कामानिमित्त वारकऱ्यांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले. आमटी, भात, चुलीवरील भाकरी आणि ठेचा असा पारंपरिक व सात्त्विक महाप्रसाद प्रेमपूर्वक वाढण्यात आला. वारकऱ्यांनीही आयोजकांच्या सेवाभावाचे कौतुक करत समाधान व्यक्त केले. मंदिर परिसर टाळ–मृदुंगाचा गजर, भजन, हरिपाठ आणि विठ्ठल नामाच्या जयघोषाने भक्तिमय वातावरणाने दुमदुमून गेला. या सेवाकार्यात श्री शुक्लेश्वर देवस्थान, शुक्लेश्वर आरती मंडळ, शुक्लेश्वर भजनी मंडळ, स्थानिक युवक आणि अनेक भाविकांनी उत्स्फूर्त सहभाग घेत वारकऱ्यांची मनोभावे सेवा केली. मुक्काम, भोजन, पिण्याचे पाणी आणि इतर आवश्यक सुविधांची उत्तम व्यवस्था करण्यात आली होती. या महाप्रसादासाठी धाडगे आणि हापसे कुटुंबीय यांनी विशेष पुढाकार घेत मोलाचे योगदान दिले. त्यांच्या सहकार्यामुळे हा सेवाभावी उपक्रम यशस्वीरीत्या पार पडला.

नितीन हापसे म्हणाले वारकऱ्यांची सेवा हीच विठ्ठलाची खरी सेवा आहे. विठ्ठल भक्तांची सेवा करण्याची संधी मिळणे, हे आमचे भाग्य आहे दरवर्षी हा सेवेचा उपक्रम अधिक भक्तिभावाने आणि मोठ्या स्वरूपात राबविण्याचा आमचा प्रयत्न राहील वारकऱ्यांच्या आशीर्वादातूनच अशा सेवाकार्यास प्रेरणा मिळते.

## समर्पण चातुर्मास धर्मयात्रेचे गोवर्धन अपार्टमेंट येथे मोठ्या उत्साहात स्वागत

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** गोवर्धन पर्वताची कथा खूप काही शिकवून जाते.भगवान श्रीकृष्णाने इंद्र देवाची पूजा बंद केली आणि गोवर्धन पर्वताची पूजा सुरू केली. प्रस्थापित सत्तेच्या विरोधात गेल्यानंतर ती सत्ता आक्रमक होते. इंद्राने मोठ्या प्रमाणात पाऊस पाडला. गोकुळात सर्व प्रजा चिंताक्रांत झाली. त्यावेळी श्रीकृष्णाने गोवर्धन पर्वताचे छत बनवू हा विचार मांडला. त्यावेळेस ही गोष्ट अशक्यप्राय आहे असे काही लोकांना वाटत होते. परंतु श्रीकृष्णाने करंगळीवर गोवर्धन उचलून धरला व गोकुळाचे संकट दूर झाले. काही लोकांना असे वाटले की माझ्या काठीवर गोवर्धन पर्वत उभा आहे परंतू जोपर्यंत श्रीकृष्णाची करंगळी गोवर्धन पर्वताला टेकलेली होती. तोपर्यंत गोवर्धन पर्वत उभाच होता. त्याचप्रमाणे गुरुदेव आचार्य भगवंत यांची अदृश्य शक्ती सर्वत्र असल्याने आलेली सर्व संकटे आपोआप च दूर होत आहे. सर्वांनी आपल्यातला मी पणा दूर करावा. जे काही चांगले होत आहे ते गुरुदेवांच्या कृपेने होत आहे असे निरुपण उपाध्याय प्रवर प. पू. श्री.प्रविणऋषीजी म.सा.यांनी केले आहे.

मार्केट यार्ड येथील गोवर्धन अपार्टमेंट येथे ''समर्पण चातुर्मास धर्मयात्रे प्रसंगी उपाध्याय प्रवर श्री प्रविणऋषीजी म.सा.यांनी धार्मिक प्रभावना प्रवचन दिले. याप्रसंगी तीर्थेशऋषीजी म.सा., समर्पण चातुर्मास कमिटीचे अध्यक्ष बाबूशेठ बोरा, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, भाजपाचे ज्येष्ठ नेते वसंत लोढा, जिल्हा उपाध्यक्ष सचिन देसरडा, ईश्वर बोरा, नगरसेवक बाळासाहेब बोराटे, संभाजी कदम आदींसह कार्यक्रम संयोजक अजित शिंगवी, सुरज गांधी, किशोर लुनिया,प्रीतम बोगावत, प्रवीण बडदाते, विपुल गांधी, ऋषभ डागा, ललित कटारिया, राजेंद्र गांधी, सिद्धेश मेहेर, नंदलाल बंग, शरद गुंजन शिंगवी, नव्या गांधी, प्रिया नहार, समृद्धी चोरडिया, अश्विनी बोगावत, स्नेहल गांधी, प्रिया डागा, लीना बडदाते आदी उपस्थित होते.

## जिल्हा न्यायालय परिसरात नव्या पोस्ट ऑफिसचे पोस्टमास्टर जनरल यांच्या हस्ते उद्घाटन



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** भारतीय डाक विभागाच्या वतीने नागरिकांना अधिक सुलभ, जलद, आधुनिक व दर्जेदार टपाल तसेच वित्तीय सेवा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने जिल्हा न्यायालय परिसर, अहिल्यानगर येथे नव्याने सुरू करण्यात आलेल्या जिल्हा न्यायालय पोस्ट ऑफिसचे उद्घाटन सौ. प्रीती अग्रवाल (), पोस्टमास्टर जनरल, पुणे क्षेत्र, पुणे यांच्या शुभहस्ते उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले.

या उद्घाटन समारंभास मा. श्री. एस. बी. कचरे, प्रधान जिल्हा व सत्र न्यायाधीश, जिल्हा न्यायालय, अहिल्यानगर तसेच मा. डॉ. दिलीप टिपरसे, उपपोलीस अधीक्षक, अहिल्यानगर यांची प्रमुख उपस्थिती लाभली. याशिवाय न्यायालयातील न्यायिक अधिकारी, विविध विभागांचे अधिकारी, बार असोसिएशनचे पदाधिकारी, अधिवक्ते, न्यायालयीन कर्मचारी, भारतीय डाक विभागाचे अधिकारी व कर्मचारी तसेच मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून उद्घाटन करण्यात आले. त्यानंतर नव्याने सुरू करण्यात आलेल्या पोस्ट ऑफिसची पाहणी करण्यात आली. मान्यवरांनी पोस्ट ऑफिसमध्ये उपलब्ध करून देण्यात आलेल्या आधुनिक सुविधा, ग्राहकाभिमुख सेवा तसेच नागरिकांच्या सोयीसाठी करण्यात आलेल्या व्यवस्थेचे कौतुक केले.

यावेळी मार्गदर्शन करताना पोस्टमास्टर जनरल सौ. प्रीती अग्रवाल यांनी भारतीय डाक विभाग हा देशातील सर्वात विश्वासार्ह सार्वजनिक सेवा पुरविणारा विभाग असून बदलत्या काळानुसार आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार करून नागरिकांना अधिक जलद, पारदर्शक आणि गुणवत्तापूर्ण सेवा देण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील असल्याचे सांगितले. जिल्हा न्यायालय परिसरात सुरू करण्यात आलेले हे पोस्ट ऑफिस न्यायव्यवस्थेशी संबंधित अधिकारी, कर्मचारी, अधिवक्ते तसेच सर्वसामान्य नागरिकांसाठी अत्यंत उपयुक्त ठरणार असल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच भारतीय डाक विभागामार्फत उपलब्ध असलेल्या बचत बँक, आधार सेवा, स्पीड पोस्ट, पार्सल, नोंदणीकृत टपाल, पोस्टल लाईफ इन्शुरन्स (), ग्रामीण पोस्टल लाईफ इन्शुरन्स (), इंडिया पोस्ट पेमेंट्स बँक () आणि इतर वित्तीय सेवांचा अधिकाधिक लाभ घेण्याचे आवाहन त्यांनी उपस्थितांना केले.

मा. प्रधान जिल्हा व सत्र न्यायाधीश श्री. एस. बी. कचरे यांनी न्यायालय परिसरात पोस्ट ऑफिस सुरू झाल्यामुळे न्यायालयीन कामकाजाशी संबंधित पत्रव्यवहार अधिक सुलभ, सुरक्षित व वेळेवर होण्यास मोठी मदत होईल, तसेच न्यायालयातील अधिकारी, कर्मचारी, अधिवक्ते आणि नागरिकांना विविध टपाल व बँकिंग सेवा एकाच ठिकाणी उपलब्ध होणार असल्याने त्यांचा वेळ व श्रम वाचतील, असे मत व्यक्त केले.नवीन पोस्ट ऑफिसमध्ये स्पीड पोस्ट, नोंदणीकृत टपाल, पार्सल बुकिंग, बचत बँक व्यवहार, आधार नोंदणी व अद्ययावत सेवा, इंडिया पोस्ट पेमेंट्स बँकेच्या सेवा, पोस्टल लाईफ इन्शुरन्स, ग्रामीण पोस्टल लाईफ इन्शुरन्स तसेच भारतीय डाक विभागाच्या इतर सर्व महत्त्वाच्या सेवा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. त्यामुळे न्यायालय परिसरातील नागरिकांना विविध सेवांसाठी शहरातील इतर पोस्ट ऑफिसमध्ये जाण्याची आवश्यकता राहणार नाही. कार्यक्रमाचे आयोजन विकासजी पालवे (), वरिष्ठ अधीक्षक डाकघर, अहिल्यानगर विभाग यांच्या मार्गदर्शनाखाली उत्कृष्टरीत्या करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी अहिल्यानगर विभागातील सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित सर्व मान्यवर, अधिकारी, कर्मचारी, अधिवक्ते, प्रसारमाध्यम प्रतिनिधी आणि नागरिकांचे आभार मानण्यात आले. जिल्हा न्यायालय पोस्ट ऑफिसच्या माध्यमातून नागरिकांना अधिक प्रभावी, विश्वासार्ह आणि सहज उपलब्ध टपाल व वित्तीय सेवा देण्याच्या भारतीय डाक विभागाच्या वचनबद्धतेचा पुनरुच्चार करण्यात आला.

# शिष्यवृत्ती परीक्षेत श्री समर्थ प्रशालेची देदिप्यमान कामगिरी; गुणवत्ता यादीत विद्यार्थ्यांचे दमदार यश

### यशामागे विद्यार्थ्यांची मेहनत आणि शिक्षकांचे व पालकांचे सहकार्य, मार्गदर्शन

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**




**अहिल्यानगर–** फेब्रुवारी २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या इयत्ता पाचवी व आठवी शिष्यवृत्ती परीक्षेचा निकाल आणि गुणवत्ता यादी नुकतीच जाहीर झाली. या परीक्षेत श्री समर्थ विद्यामंदिर प्रशालेच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन करत गुणवत्ता यादीत मानाचे स्थान मिळवले. या यशस्वी विद्यार्थ्यांचे प्रशालेत शालेय समिती चेअरमन मा. ॲड .श्री किशोरजी देशपांडे सर, तसेच संस्थेचे सर्व पदाधिकारी शिक्षक व शिक्षकेतर सहकारी यांनी अभिनंदन व कौतुक केले.

याप्रसंगी शालेय समितीचे चेअरमन ॲड.श्री. देशपांडे सर , मुख्याध्यापिका सौ. वसुधा जोशी मॅडम, पर्यवेक्षक श्री. एल. कुलकर्णी, इयत्ता आठवीचे मार्गदर्शक शिक्षक सौ. शास्त्री मॅडम, श्री. पथवे सर, सौ. मेलगर मॅडम, तसेच इयत्ता पाचवीच्या मार्गदर्शक शिक्षिका सौ. प्रियंका कासार (बांगर), सौ. चैताली गोरे (नवले) आणि श्री. संकेत शिंदे उपस्थित होते. विद्यार्थ्यांच्या यशामागे त्यांच्या सातत्यपूर्ण अभ्यासाबरोबरच शिक्षकांचे नियोजनबद्ध मार्गदर्शन आणि पालकांचे सहकार्य महत्त्वाचे असल्याचे उपस्थित मान्यवरांनी नमूद केले.

शालेय समितीचे चेअरमन मा.श्री. देशपांडे सर म्हणाले, ''शिष्यवृत्ती परीक्षा ही विद्यार्थ्यांच्या बौद्धिक क्षमतेला योग्य दिशा देणारी परीक्षा आहे. श्री समर्थ प्रशालेच्या विद्यार्थ्यांनी मिळवलेले हे यश संपूर्ण संस्थेसाठी अभिमानास्पद असून भविष्यातही अशीच उज्ज्वल कामगिरी कायम ठेवावी.

मुख्याध्यापिका सौ. वसुधा जोशी यांनी आपल्या सांगितले, ''विद्यार्थ्यांचे यश हे शिक्षकांच्या मेहनतीचे आणि पालकांच्या विश्वासाचे फलित आहे. शिस्तबद्ध अभ्यास, सातत्य आणि योग्य मार्गदर्शन यांच्या बळावर विद्यार्थ्यांनी गुणवत्ता यादीत स्थान मिळवले आहे. भविष्यातही अधिकाधिक विद्यार्थी राज्यस्तरावर चमकावेत, यासाठी प्रशाला कटिबद्ध आहे.'

**इयत्ता पाचवी शिष्यवृत्ती परीक्षेतील गुणवंत विद्यार्थी**

ऋषभ नागरगोजे २६८ गुण (जिल्हा गुणवत्ता यादीत चौथा), आस्था भंडारी २५६ गुण (१७ वी), प्रांजल बोरकर २३८ गुण (४९ वी), साईश पालवे २३६ गुण (५६ वा), श्रीनय कोठुळे २३० गुण (७८ वा), शेटे २२६ गुण (९१ वा), अद्वैत धनेश्वर २१८ गुण (१३२ वा), सुयोग निकम २१६ गुण, केतकी लुमपाटकी २१२ गुण (१७८ वी), अदिती जाधव २०६ गुण (२४४ वी), प्रियांजली पालवे २०४ गुण (२६२ वी)

इयत्ता आठवी शिष्यवृत्ती परीक्षेतील गुणवंत विद्यार्थी

स्मित गायकवाड २६२ गुण (जिल्हा गुणवत्ता यादीत ३० वा), सर्वेश मुटकुळे २३६ गुण (११० वा) यश घोरपडे २३६ गुण (११६ वा), सात्विक दातीर २३४ गुण (१२० वा) .



छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील खुलताबाद तालुक्यातील श्री लक्ष्मी नृसिंह पालखी पाडळी( देवाची )पायी दिंडीचे स्वागत गजराज नगर येथे करण्यात आले. भिकन सूर्यवंशी – स्वाती सूर्यवंशी यांनी पादुकांची पुजा केली. यावेळी हभप धनंजय म्हस्के, हभप दिलीप जाधव, दिंडी प्रमुख प्रसाद पाडळकर, दिंडी चालक गणेश आहेवाड, वाल्मीक सूर्यवंशी, पवन सुर्यवंशी परिसरातील भाविक उपस्थित होते. (छाया – विजय मते)

# 'विद्यार्थ्यांचे शिक्षण वाऱ्यावर, शिक्षकांना दारोदारी भटकण्यास भाग पाडू नका' – बाबासाहेब बोडखे

### मतदार यादी पुनरीक्षणासाठी शिक्षकांची नियुक्ती थांबवा; शिक्षक परिषदेची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** मतदार यादी पुनरीक्षण मोहिमेसाठी शिक्षकांची वर्ग सुरू असतानाच नियुक्ती केल्यामुळे राज्यातील लाखो विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर गंभीर परिणाम होत असून, विशेषतः गोरगरीब व सामान्य कुटुंबातील विद्यार्थ्यांचे भविष्य धोक्यात आले असल्याचा गंभीर आरोप महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेने केला आहे. पोलीस विभागाप्रमाणेच शिक्षक कर्मचाऱ्यांनाही अशैक्षणिक व इतर प्रशासकीय कामांपासून वगळण्यात यावे आणि त्यांची सेवा कोणत्याही परिस्थितीत अधिग्रहित करू नये, अशी मागणी शिक्षक परिषदेचे राज्य कार्याध्यक्ष तथा माजी शिक्षक आमदार नागो गाणार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री, शालेय शिक्षण मंत्री तसेच शिक्षण विभागाकडे निवेदनाद्वारे केली असल्याची माहिती शिक्षक परिषदेचे जिल्हाध्यक्ष बाबासाहेब बोडखे यांनी दिली.

निवेदनात म्हटले आहे की, सर्वोच्च न्यायालयाने निवडणूक आयोग विरुद्ध सेंट मर्सी स्कूल या प्रकरणात ६ डिसेंबर २००७ रोजी दिलेल्या ऐतिहासिक निर्णयामध्ये अध्यापन करणाऱ्या शिक्षकांची निवडणुकीसंदर्भातील कामांसाठी नियुक्ती शक्यतो सुट्टीच्या दिवशी, अध्यापन नसलेल्या दिवशी किंवा शाळेच्या वेळेनंतरच करावी, असे स्पष्ट निर्देश दिले आहेत. या निर्णयामागील मुख्य उद्देश विद्यार्थ्यांच्या शिक्षणात कोणताही अडथळा निर्माण होऊ नये हा होता.



मात्र प्रत्यक्षात राज्यातील शिक्षकांना वर्ग सुरू असतानाच मतदार यादी पुनरीक्षणाचे काम सोपविण्यात आले आहे. एवढेच नव्हे तर कामात अडचणी आल्यास संबंधित शिक्षकांवर एफआयआर दाखल करण्याची धमकी दिली जात असल्याचा आरोपही शिक्षक परिषदेने केला आहे. त्यामुळे शिक्षकांना अपमानास्पद वागणूक मिळत असून त्यांच्याकडून वेठबिगाराप्रमाणे काम करून घेतले जात असल्याची भावना शिक्षकांमध्ये निर्माण झाली आहे.

अनुदानित व अंशतः अनुदानित शाळांतील शिक्षकांना अध्यापनाचे काम बाजूला ठेवून मतदार यादी पुनरीक्षणासाठी दारोदारी जाऊन माहिती संकलित करण्यास भाग पाडले जात आहे. परिणामी वर्गातील विद्यार्थ्यांचे नियमित अध्यापन विस्कळीत होत असून विशेषतः ग्रामीण भागातील व आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांतील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे. विद्यार्थ्यांच्या भविष्याची कोणतीही चिंता शासन व प्रशासनाला नसल्याचा आरोपही शिक्षक परिषदेने केला आहे.

शिक्षक परिषदेच्या मते, शिक्षकांचे मनुष्यबळ शैक्षणिक कार्यासाठी असून ते निवडणूक अथवा इतर अशैक्षणिक कामांसाठी सातत्याने वापरणे ही गंभीर बाब आहे. अशा प्रकारे विद्यार्थ्यांच्या शिक्षणाशी तडजोड करणे सामाजिक हिताच्या दृष्टीनेही अयोग्य असून, पोलीस विभागाप्रमाणेच शिक्षक कर्मचाऱ्यांनाही अशैक्षणिक कामांमधून कायमस्वरूपी वगळण्याचा धोरणात्मक निर्णय शासनाने घ्यावा. गोरगरीब व सामान्य कुटुंबातील विद्यार्थ्यांच्या भविष्यावर निर्माण झालेले हे संकट तातडीने दूर करून शिक्षकांना पुन्हा पूर्णवेळ अध्यापनासाठी उपलब्ध करून द्यावे, तसेच सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाचे काटेकोर पालन करावे, अशी मागणी शिक्षक परिषदेच्या वतीने करण्यात आली आहे.

शिक्षक हा समाजातील महत्त्वाचा घटक आहे. समाज व मुलांचे भवितव्य घडविण्याचे काम शिक्षक करतात. मात्र शिक्षकांवर अशैक्षणिक कामांचा बोजा चढवून त्यांना शिक्षणाच्या मुख्य हेतूपासून लांब नेले जात आहे. याचे दुरगामी परिणाम भविष्यात होण्यासारखे आहे. यासाठी शासनाने सकारात्मक भूमिका घेऊन 'विद्यार्थ्यांचे शिक्षण वाऱ्यावर, शिक्षकांना दारोदारी भटकण्यास भाग पाडू नका'
–बाबासाहेब बोडखे (जिल्हाध्यक्ष, महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद)

## डॉक्टरांवरील हल्ल्यांविरोधात आयएमए अहिल्यानगरच्या वतीने निषेध

### डोंबिवलीतील मारहाणीच्या निषेधार्थ २० जुलैला २४ तासांचा लाक्षणिक संप

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** डोंबिवली महानगरपालिका रुणालयात डॉक्टरांवर झालेल्या मारहाणीच्या घटनेने वैद्यकीय क्षेत्रात संतापाची लाट उसळली आहे. डॉक्टरांवरील वाढत्या हल्ल्यांना चाप लावण्यासाठी महाराष्ट्र वैद्यकीय संघटनेने पुकारलेल्या लाक्षणिक संपाला आयएमए, अहिल्यानगर शाखेने पाठिंबा दिला आहे. त्याच्या निषेधार्थ २० जुलै रोजी सकाळी ६ वाजल्यापासून २४ तासांचा लाक्षणिक संप करण्यात येणार असल्याची माहिती आयएमएचे अध्यक्ष डॉ. धनंजय कुलकर्णी व सचिव डॉ. अमित करडे यांनी दिली.

या संपाच्या काळात सर्व बाह्यरुग्ण विभाग (ओपीडी) तसेच नियोजित शस्त्रक्रिया बंद राहणार आहेत. मात्र, रुग्णांच्या जीविताशी संबंधित तातडीची व अत्यावश्यक रुग्णसेवा सुरू ठेवण्यात येणार आहे. डॉक्टरांवरील हल्ले कोणत्याही परिस्थितीत सहन केले जाणार नाहीत, असा स्पष्ट संदेश या आंदोलनातून देण्यात येणार आहे.

डॉक्टर व वैद्यकीय कर्मचाऱ्यांना सुरक्षित वातावरणात सेवा बजावता यावी, यासाठी शासनाने कठोर पावले उचलण्याची गरज आहे. डॉक्टरांवरील हल्ल्यांविरोधात वैद्यकीय क्षेत्रातील सर्व घटकांनी एकजुटीने उभे राहावे, असे आवाहन डॉ. धनंजय कुलकर्णी व डॉ. अमित करडे यांनी केले आहे.

## टाळ-मृदंगाच्या गजरात शिक्षणाच्या हक्काचा जागर; दिंडी सोहळा नगरमधून पंढरीकडे मार्गस्थ

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** सरकारी शाळा वाचवा आणि मोफत शिक्षण न्याय व हक्क परिषद अहिल्यानगर शाखेच्यावतीने पंढरपूर पायी दिंडी सोहळा आयोजित करण्यात आला आहे. हा दिंडी सोहळा नुकताच नगर शहरातून पंढरपूरकडे मार्गस्थ झाला. या दिंडीत वारकरी मोठ्या संख्येने सहभागी झाले आहेत. टाळ मृदंगाच्या गजरात विठूरायाच्या नामस्मरणात दिंडी पंढरपूरकडे निघाली आहे. या बरोबरच दिंडीच्या माध्यमातून गावोगावी जनजागृतीही करण्यात येत आहे.

दिंडीच्या मुख्य उद्देशाबाबत माहिती देताना मुख्य संयोजक सुदाम लगड म्हणाले, प्राथमिक, उच्च माध्यमिक व उच्च शिक्षण क्षेत्रातील खासगीकरण थांबवावे, लहान शाळा बंद करुन एकच शाळा बनवण्याचे धोरण थांबवावे, वाड्यावस्त्यांवरील दहा किंवा २० पटांखालील शाळा बंद करू नयेत, अंगणवाडी ते उच्च व्यावसायिक शिक्षण मोफत व सक्तीचे करण्यात यावे, खासगी व स्वयंअर्थसहाय्यित शाळा महाविद्यालयांतून शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक शुल्क सरकारने भरावे, राज्य सरकारी कर्मचाऱ्यांना सक्तीने त्यांची मुले सरकारी शाळेत शिकवणे बंधनकारक करावे, लोकप्रतिनिधींना सरकारी शाळा दुरुस्ती व देखभाल निधी शासनाने उपलब्ध करुन द्यावा, शिक्षण विभागातील सर्व रिक्त पदे लवकरात लवकर भरावीत यांबाबत जनजागृती करण्याच्या उद्देशाने दिंडी काढण्यात आली आहे.

दिंडी मंगळवारी नगर शहरातून मार्गस्थ झाली असून शनिवारी करमाळा येथे पोहोचेल. त्यानंतर रविवारी जेऊर येथे मुक्कामी असेल. त्यानंतर सोमवारी (दि.२०) कंदर येथे दिंडीचा मुक्काम राहील. मंगळवारी (दि.२१) दगडी अकोला, बुधवारी (दि.२२) भोसे फाटा, गुरुवारी (दि.२३) दिंडी पंढरपूर नगरीत प्रवेश करणार आहे. त्यानंतर शुक्रवार आणि शनिवार दोन दिवस दिंडी पंढरपुरातच मुक्कामी राहील अशी माहिती सरकारी शाळा वाचवा आणि मोफत शिक्षण न्याय व हक्क परिषेचे मुख्य संयोजक सुदाम लगड यांनी दिली. या दिंडी सोहळ्यासाठी वैष्णव सेवा मंडळ, सुनील त्रिपाठी, सुनील दातरंगे, ईश्वर परदेशी, नाना गायकवाड, ज्ञानदेव म्हस्के, अनंत द्रविड, दिगंबर मुळे, डॉ. साळवे, बाळकृष्ण खेचे महाराज, कानिफनाथ पंडीत, कृष्णा महाराज येळवंडे, शीतल त्रिपाठी आदींचे सहकार्य लाभले आहे.

वारकऱ्यांच्या आरोग्याचीही काळजी

विठ्ठलनामाचा गजर करत वारकरी पंढरपूरला निघाले आहेत. या दिंड्यांचे गावोगावी नागरिक स्वागत करत आहेत. वारकऱ्यांसाठी ठिकठिकाणी भोजन आणि महाप्रसादाची व्यवस्था केली जाते.

(पान १ वरून)

## जिल्ह्यातील १२ दुय्यम कारागृहांना टाळे!

असा गंभीर प्रश्न आता निर्माण झाला आहे. ४० वर्षांची सोय एका झटक्यात बंद झाल्याने पोलिसांचे रोजचे वेळापत्रक कोलमडले असून पेट्रोल-डिझेलचा खर्च, वाहनांची झीज आणि कर्मचाऱ्यांवरील मानसिक ताण कमालीचा वाढला आहे.

**...तर कैद्यांना जनावरांसारखं ठेवणार का?**

''कैद्यांनाही मानवाधिकार आणि कायदेशीर हक्क आहेत. त्यांना अशा पद्धतीने मध्यवर्ती कारागृहात जनावरांसारखे कोंबून ठेवणे कितपत योग्य आहे? तालुका स्तरावरील उपकारागृहांची तातडीने डागडुजी करून ती पुन्हा सुरू करावीत, जेणेकरून आरोपी आणि पोलीस प्रशासनाची होणारी हेळसांड थांबेल. या गंभीर प्रश्नाबाबत आम्ही लवकरच राज्याच्या गृहमंत्र्यांची भेट घेणार आहोत.''
स्वप्नील मापारी
(तालुकाध्यक्ष,आंतरराष्ट्रीयमानवाधिकारआयोग,नेवासा)

दोन्हीकडचीकारागृहेहाऊसफुल्ल;कैद्यांचेहालकुत्राखाईना!

या संपूर्ण गोंधळात केवळ पोलीसच नाही, तर कैद्यांचेही अतोनात हाल होत आहेत. अहिल्यानगर जिल्हा कारागृहाची अधिकृत क्षमता अवघी १०९ कैद्यांची आहे, मात्र प्रत्यक्षात तिथे २२८ कैदी खितपत पडले आहेत. त्यात रोज ४ ते ५ नवीन कैद्यांची भर पडत आहे. जिल्हा कारागृहातील ही गर्दी असह्य झाल्याने प्रशासनाने कसेबसे पत्रव्यवहार करून ४२९ कैद्यांना नाशिक मध्यवर्ती कारागृहात हलवण्याची मान्यता मिळवली. परंतु, नाशिक मध्यवर्ती कारागृहाची कहाणीही वेगळी नाही. नाशिक कारागृहाची अधिकृत क्षमता ३,२०८ कैद्यांची असताना तिथे आधीच ३,३१८ कैदी दाटीवाटीने राहत आहेत. त्यात अहिल्यानगरचे हे ४२९ कैदी नव्याने दाखल झाल्याने कैद्यांना मूलभूत सुविधा मिळणे दुरापास्त झाले आहे. दोन्ही बाजूची कारागृहे हाऊसफुल्ल असल्याने गृह विभागाने यावर नव्याने विचार करून तालुका स्तरावरील उपकारागृहे तातडीने पूर्ववत करावीत, अशी तीव्र मागणी आता जोर धरू लागली आहे.

## उद्योजक सोमनाथ वरखडेंचा राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये पक्षप्रवेश

वाढेल. नव्याने पक्षात सहभागी झालेल्या प्रत्येक सहकाऱ्याच्या विश्वासाला न्याय देणे हीच आमची जबाबदारी आहे.'' उद्योजक सोमनाथ वरखडे यांनीही आपल्या भावना व्यक्त करत आमदार काशिनाथ दाते यांच्या विकासाभिमुख कार्यपद्धतीवर आणि सर्वसामान्यांशी असलेल्या जिव्हाळ्याच्या नात्यावर विश्वास व्यक्त केला. समाजाच्या प्रगतीसाठी सकारात्मक राजकारणाची गरज असून त्या विचारातूनच आपण राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी जिल्हा बँकेचे संचालक प्रशांत गायकवाड, जिल्हा परिषद माजी सदस्य वसंतराव चेडे, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष आर. एस. कापसे, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष संदीपशेठ रोहोकले, राष्ट्रवादी काँग्रेसच्या जिल्हा कार्याध्यक्षा सुधामती कवाद, युवक राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष भास्कर उचाळे, बाळासाहेब लामखडे, विठ्ठल कवाद, आनंदराव वराळ, व्हा. चेअरमन हिरामण सोनवणे, रोहीदास लामखडे, महादू लामखडे यांच्यासह तालुक्यातील विविध गावांतील पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सोनम वांगचुक यांना जबरदस्तीने उचलून नेणारं मोदी सरकार डरपोक – किरण काळे

झाल्याशिवाय राहणार नाही. हा वनवा आता सरकार रोखू शकत नाही. सरकारच्या या दडपशाहीचा आम्ही तमाम अहिल्यानगरकर आणि शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने तीव्र निषेध करतो.

आंदोलन राजकारण विरहितच रहावे :

तरुणाईच्या भवितव्याच्या संरक्षणासाठी उभे राहिलेले हे आंदोलन राजकारण विरहित आहे. ते तसेच राहणे आवश्यक आहे. वांगचुक यांना मागील दोन दिवसांपासून देशभरातून प्रचंड मोठ्या प्रमाणात पाठिंबा मिळत आहे. तरुणाई, नागरिक स्वयंस्फूर्तीने रस्त्यावर उतरत आहेत. अहिल्यानगर शहरात देखील शुक्रवारी सायंकाळी शेकडो विद्यार्थी, विद्यार्थिनी, सजक नागरिकांनी काढलेला कॅन्डल मार्च समाजाची यावर असणारी तीव्र भावना व्यक्त करणारा आहे. या आंदोलनाला आम्ही ठाकरे शिवसेनेच्या वतीने पाठिंबा दिला आहेच. परंतु राजकीय नेते, कार्यकर्ते यांच्यापेक्षा सर्वसामान्य नागरिकांनीच या आंदोलनाचा चेहरा व्हावे, असे आमचे स्पष्ट मत आहे. अहिल्यानगरसह देशात ठिणगी पडली आहे. आता हा वनवा सरकार रोखू शकत नाही, असे किरण काळे यांनी म्हटले आहे.

मोदी सरकार असंवेदनशील :

नैतिकतेच्या मुद्द्यावरून यापूर्वी अनेक मंत्र्यांनी राजीनामा दिल्याची उदाहरण आहेत. रेल्वे अपघातात शेकडो नागरिकांचा बळी गेला म्हणून तत्कालीन रेल्वेमंत्री लालबहादूर शास्त्री, एलआयसी घोटाळ्याच्या मुद्द्यावरून तत्कालीन अर्थमंत्री कृष्णमाचारी, भारत-चीन युद्धाच्या पराभवाची नैतिक जबाबदारी स्वीकारून तत्कालीन संरक्षण मंत्री के. कृष्ण मेनन यांच्या सह अनेक मंत्र्यांनी राजीनामा दिल्याची उदाहरण आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा यापूर्वीच घ्यायला हवा होता. प्रधान यांनी देखील पायउतार व्हायला हवे होते. डीलिमिटेशन विधेयक मंजूर करण्यासाठी देशभर खासदार फोडाफोडी, राम मंदिराची तिजोरी लूट यामध्ये मशगूल असणारे सरकार नींदेस पात्र आहे. मोदी सरकार असंवेदनशील टीका काळे यांनी केली आहे.